क्रमांक : १९

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ / फाल्गुन ५, १९४३ (शके)

### १९. सदस्यांना अटक , अटकाव, स्थानबध्दता, सुटका इत्यादीबाबत

मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांना सहायक संचालक, सक्तवसुली संचालनालय, मुंबई यांचेद्वारे कळविण्यात आले आहे की, राष्ट्रीय तपास संस्था (NIA) यांचेद्वारे दिनांक ०३/०२/२०२२ रोजी नोंद करण्यात आलेल्या FIR No. RC०१/२०२२/NIA/MUM च्या आधारे सक्तवसुली संचालनालयाद्वारे (Money laundering case) प्रकरणी (Prevention of Money laundering Act, २००२) च्या कलम ४ नुसार शिक्षा पात्र असलेले प्रकरण क्र. ECIR NO. ECIR/MBZO-I/१०/२०२२ या अधिनियमाच्या कलम ३ नुसार दाखल करण्यात आले आहे.

यासंदर्भात असेही कळविण्यात आले आहे की, Prevention of Money Laundering Act, २००२ मधील तरतुदींच्या अधीनतेने या प्रकरणात करण्यात आलेल्या तपासादरम्यान श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक, विधानसभा सदस्य, अणुशक्ती नगर मतदारसंघ यांना सक्तवसुली संचालनालय, मुंबई झोनल कार्यालय -१ मुंबई यांचेद्वारे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी त्यांचा Money laundering गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याने त्या कायद्यानुसार सर्व कायदेशीर बाबींची प्रक्रिया पूर्ण करुन अटक करण्यात आली आहे.

तत्पश्चात श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक, वि.स.स. यांना मा.विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आल्यावर त्यांचेविरुध्द सादर करण्यात आलेली वस्तुस्थिती व आधारसामुग्री विचारात घेऊन मा.विशेष न्यायालयाने श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक, वि.स.स. यांचा ताबा दिनांक ३ मार्च, २०२२ पर्यंत सक्तवसुली संचालनालयास सूपूर्द केलेला आहे.

विधान भवन,<br>
मुंबई,<br>
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२२

**राजेन्द्र भागवत**<br>
प्रधान सचिव<br>
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

\\MLS-DATASERVER\F Branch\१-4\ PC data\Bul Part 2\BULL PART YEAR 2022.docx